1 8 JUN 2021 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडापटूंनी योगावर भर द्यावा; कुलगुरू डॉ. शिर्के

आर. के. नगर, ता. १७ : ''शारीरिक आणि मानसिक संतुलन, स्वास्थ्य राखण्यासाठी क्रीडापटूंनी नियमितपणे योग सरावावर भर द्यावा'', असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग व कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनार झाले.

प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. ए. एम. गुरव, समन्वयक, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, डॉ. बी. एन. उलपे आदी उपस्थित होते.



कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''गेल्या दोन वर्षांमध्ये कोरोनाच्या साथीमुळे जगभरातील संपूर्ण व्यवहार प्रभावित झाले आहेत. क्रीडा क्षेत्रही त्याला अपवाद नाही. मैदानावरील नियमित सराव आणि व्यायाम यांना क्रीडापटू मुकले आहेत. त्यामुळे क्रीडापटूंमध्ये अस्वस्थता आहे. आपल्याला या वातावरणाला धीराने सामोरे जावे लागणार आहे.

पहिल्या सत्रात डॉ. देवाशिष बागची यांनी 'व्यावसायिक संधी व क्रीडा व्यवस्थापन' यावर विवेचन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. व्यंकट वांगवाड यांनी 'कार्यक्षमता व जीवन कौशल्य विकसित करण्यासाठी क्रीडा क्षेत्राची भूमिका' यावर मार्गदर्शन केले. तसेच वेबिनारमधील सहभागींच्या शंकांचे निरसन केले. तिसऱ्या सत्रात योगा पंडित श्वेतलीना पाटील यांनी 'योग व क्रीडा' आणि चौथ्या सत्रात अरविंद फाळके यांनी 'अॅक्युप्रेशर व खेळाडूंचे आरोग्य' यावर मार्गदर्शन केले. डॉ. दीपक डांगे-पाटील, डॉ. एम. ए. कदम-पाटील, डॉ. एम. आर. पाटील, सुचय खोपडे, महेश चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 8 JUN 2021

पुढारी

# क्रीडापटूंनी नियमितपणे योग सरावावर भर द्यावा

## कुलगुरू डॉ. शिर्के; विद्यापीठात राष्ट्रीय वेबिनार उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शारीरिक व मानसिक संतुलन व स्वास्थ्य राखण्यासाठी क्रीडापटूंनी नियमितपणे योग सरावावर भर देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभाग व कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्ताने आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनारच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण डॉ. पी. टी. गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, दोन वर्षांमध्ये कोरोनामुळे संपूर्ण व्यवहार प्रभावित झाले असून क्रीडा क्षेत्रही त्याला अपवाद नाही. मैदानावरील नियमित सराव आणि व्यायाम यांना क्रीडापटू मुकले आहेत. त्यामुळे क्रीडापटूंमध्ये अस्वस्थता आहे. या वातावरणास धीराने सामोरे जाऊन कारकीर्द घडवायची, तर त्यासाठी नियमित योग सराव करण्यास पर्याय नाही.

डॉ. देवाशिष बागची यांनी 'व्यावसायिक संधी व क्रीडा व्यवस्थापन' विषयावर विवेचन केले. डॉ. व्यंकट वांगवाड यांनी 'कार्यक्षमता व जीवन कौशल्य विकसित करण्यासाठी क्रीडा क्षेत्राची भूमिका' विषयावर मार्गदर्शन केले. योगा पंडित श्वेतलीना पाटील यांनी 'योग व क्रीडा' व अरविंद फाळके यांनी 'एक्युप्रेशर व खेळाडूंचे आरोग्य' विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सदस्य डॉ. बी. एन. उलपे, डॉ. दीपक डांगे-पाटील, डॉ. एम. ए. कदम-पाटील, डॉ. एम. आर. पाटील, सुचय खोपडे, महेश चव्हाण उपस्थित होते.

1 8 JUN 2021 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑनलाईन पर्याय नोंदविलेल्या १६ हजार विद्यार्थ्यांची ३० पासून परीक्षा

## लोकमत इफेक्ट : शिवाजी विद्यापीठाकडून वेळापत्रक जाहीर

कोल्हापूर : ऑनलाईन पर्याय नोंदविलेल्या शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १६ हजार विद्यार्थ्यांची ३० जूनपासून ऑनलाईन स्वरूपात परीक्षा होणार आहे. परीक्षेचे वेळापत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळाने गुरुवारी जाहीर केले.

परीक्षेसाठी ऑफलाईन पर्याय निवडलेल्या कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील १७ हजार विद्यार्थ्यांनी दोनवेळा संधी देऊनही ऑनलाईन पर्यायाची नोंद केली नव्हती. त्याकडे 'लोकमत'ने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १७ हजार विद्यार्थी परीक्षेला मुकणार' या वृत्ताच्या माध्यमातून विद्यार्थी आणि विद्यापीठाचे लक्ष वेधले. त्यावर या विद्यार्थ्यांना परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय विद्यापीठाच्या अधिकार मंडळांनी घेतला. त्यानुसार या विद्यार्थ्यांना ७ ते १३ जूनपर्यंत ऑनलाईन पर्याय नोंदविण्याची संधी दिली. या काळात ११ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाईनची नोंद केली, तर तांत्रिक अडचणीमुळे ज्यांना काही विषयांची परीक्षा देता आली नाही त्या पाच हजार विद्यार्थ्यांनी नोंद केली आहे.




### विविध १०९ परीक्षा होणार

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., बीबीए., एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी., आदी विविध १०९ विषयांच्या परीक्षा होणार आहेत. एक तासाच्या परीक्षेसाठी ५० गुणांचा पेपर असणार आहे. त्यात एमसीक्यू स्वरूपातील २५ प्रश्न असतील. दिवसभरात चार सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात येणार असल्याचे परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JUN 2021
पुढारी

# विद्यापीठाच्या पुनश्च: परीक्षा ३० जूनपासून



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० सत्रातील कोरोना प्रादुर्भावामुळे ऑफलाईन परीक्षा न देऊ शकलेले व ऑनलाईन परीक्षा देताना तांत्रिक अडचणी आलेल्या विद्यार्थ्यांच्या पुनश्च: परीक्षा ३० जूनपासून सुरू होणार आहेत. १०९ अभ्यासक्रमांसाठी परीक्षेसाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे १६ हजार विद्यार्थी असणार आहेत.

परीक्षा विभागाच्या वतीने बुधवारी वेळापत्रक जाहीर केले. परीक्षेचा कालावधी एक तासाचा असणार आहे. ५० गुणांची बहुपर्यायी 'एमसीक्यू' पद्धतीने ऑनलाईन चार सत्रांत परीक्षा घेतल्या जाणार आहेत. यात ऑफलाईन टू ऑनलाईन पर्याय निवडलेले ११ हजार व ऑनलाईन परीक्षा देताना अडचणी आलेल्या ५ हजार विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ३० जूनपासून बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बीसीए, बी.सी.एस., बी.व्होक, बी.जे., बॅचलर ऑफ डिझाईन, एम.ए.मास कम्युनिकेशन, एम.ए., एम.एस्सी., एम.कॉम., बी.टेक, वायसीएसआरडीच्या विविध सत्रांतील परीक्षा होणार आहे. शेवटची संधी म्हणून विद्यार्थ्यांच्या परीक्षा देता येणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 9 JUN 2021
सकाळ

# प्रा. के. एम. गरडकर यांना नामवंत शास्त्रज्ञांमध्ये स्थान

## १५० शोधनिबंध आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध

**सकाळ वृत्तसेवा**

कंदलगाव, ता. १८ : एडी सायंटिफिक इंडेक्स या संस्थेने जाहीर केलेल्या सर्वेक्षणात शिवाजी विद्यापीठ रसायनशास्त्र विभागातील प्रा. के. एम. गरडकर यांना नामवंत शास्त्रज्ञांमध्ये स्थान मिळाले आहे. प्रा. गरडकर यांनी संशोधन क्षेत्रात भरीव कामगिरी केली असून, त्यांनी १५० हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध केले आहेत. त्यांच्या संशोधनासाठी जवळपास चार हजार सायटेशन, ३७ एच इंडेक्स, ८७ आय इंडेक्स मिळाले आहेत.

प्रा. गरडकर यांची महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्स फेलोपदी निवड झाली आहे. त्यांनी नॅनो मटेरियल्सवर संशोधन करून



गरडकर

अर्ध्या तासात रंगमिश्रित पाणी सूर्यप्रकाशाच्या मदतीने शुद्ध करण्याचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. पाना-फुलांच्या मदतीने बहुउपयोगी नॅनो मटेरियल्स उदा. झिंक ऑक्साईड, टिटॅनियम ऑक्साईड, झिरकोनियम ऑक्साईड, सोने-चांदी यांचे सूक्ष्म धातूकण तयार केलेले आहेत.

या सर्वांचा उपयोग पाणी शुद्धीकरणासाठी बायोमेडिकल तसेच रसायनाचे पृथक्करण करण्यासाठी केला जातो. आजपर्यंत प्रा. गरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली १५ विद्यार्थ्यांना पीएच.डी. मिळाली असून, आठ विद्यार्थी विविध विषयांवर संशोधन करीत आहेत.